दै. प्रजावाणी

# महापालिका निवडणूक लढविलेल्या उमेदवारांवर शपथपत्रे शोधण्याची वेळ

## आधी दिलेल्या गुन्हेगारी व संपत्तीचा तपशील पुन्हा बंधनकारक

नांदेड,दि.७: निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास नामनिर्देशनपत्रासोबत त्याच्यावरील सर्व प्रकारचे गुन्हे व प्रलंबित खटल्यांची माहिती तसेच संपत्तीचा संपूर्ण तपशील देणे बंधनकारक असताना आता यापुर्वी निवडणूक लढविलेल्या उमेदवारांना यंदाची निवडणूक लढवायची असल्यास संबंधितांनी यापूर्वी निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या गुन्हे व तपशीलाच्या शपथपत्रातील माहिती पुन्हा एकदा सादर करावी लागणार आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे विद्यमान नगरसेवकांसह याआधीच्या दोन निवडणुका लढविलेल्या उमेदवारांमध्ये खळबळ निर्माण झाली असून आधीची शपथपत्रे शोधण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

राजकारणातून गुन्हेगारीकरण आणि अवैध संपत्ती गोळा करणाऱ्या राजकारण्यांना चाप लावण्यासाठी निवडणूक आयोगाने उमेदवारांना निवडणूक लढवतानाच त्यांच्यावरील गुन्हे व कुटुंबातील व्यक्तींच्या संपत्तीचा तपशील देणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे अलिकडच्या दहा-बारा वर्षांत उमेदवारांच्या संपत्तीची व त्यांच्यावर दाखल गुन्हे व सुरू असलेल्या खटल्यांची माहिती सर्वसामान्य जनतेला मिळत आहे. निवडणूक प्रचारात देखील या विषयावर मोठी चर्चा होऊन मतदारांना जाणीव करून दिली जात असल्यामुळे चारित्र्यवान उमेदवार निवडण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ...

### संपत्तीची भरभराट व गुन्ह्यांचा आलेख कळणार

या निर्णयामुळे आधी निवडणूक लढविलेल्या उमेदवार अथवा नगरसेवकांच्या संपत्तीत मागच्या दहा-बारा वर्षात किती भरभराट झाली तसेच गुन्ह्याचा चढता किंवा उतरता आलेख कसा आहे, याची संपूर्ण कुंडलीच मतदारांच्या हाती लागणार आहे. आयोगाच्या या दणक्यामुळे विद्यमान नगरसेवकांसह माजी नगरसेवकही बैचेन झाले आहेत. कडवी झुंज देऊन पराभूत झालेल्यांनाही नव्या नियमाची चिंता वाटू लागली आहे.

निवडणूक आयोगाचा कारभार पारदर्शक असून गेल्या दहा-बारा वर्षांपासून निवडणूक लढविण्यासाठी नामनिर्देशनपत्र सादर करताना संपत्ती व गुन्ह्यांबाबत दाखल केलेली शपथपत्रातील संक्षिप्त माहिती संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात जाहीरपणे प्रसिद्ध केली जातात. त्यामुळे कोणता उमेदवार जास्त श्रीमंत, कोणत्या उमेदवाराकडे भौतिक साधनांची कमतरता नाही, कोणाच्या नावाने किती जमिन, किती फ्लॅट, हातात व खात्यात रक्कम किती शिल्लक आहे, किती कर्ज आहे, घरात दागदागिने किती आहेत उमेदवारासह त्याच्या

▪पान २ वर

### महापालिका निवडणूक लढविलेल्या ...

कुटुंबातील सदस्यांच्या संपत्तीची माहिती सर्व मतदारांना समजते. उमेदवारांवर दाखल असलेले फौजदारी गुन्हे आणि न्यायालयात सुरू असलेल्या संबंधित खटल्यांबाबत माहिती, शिक्षा झाली असल्यास अथवा अपिल असल्यास त्याबद्दलची संपूर्ण माहितीही शपथपत्रात द्यावी लागत असल्याने उमेदवाराची श्रीमंती व चारित्र्य एका क्षणात कळू शकते.

यापूर्वीच्या दोन्ही निवडणुकीत गुन्हेगारी व संपत्तीचा दिलेल्या तपशीलाची येत्या ११ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीत उजळणी करावी लागणार आहे. १६ ते २३ सप्टेंबर २०१७ या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवारांना गुन्हेगारी व संपत्तीचा तपशील देताना यापुर्वी निवडणूक लढविली असल्यास तेव्हा दिलेल्या तपशीलाची माहितीही अर्जासोबत सादर करणे बंधनकारक केले आहे.